DAY — 12 SEAT NUMBER

| 2024 | III | 06 | 1100 | J-890 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY AND DEVELOPMENT OF INDIAN MUSIC (65)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 100

*सूचना : (१) प्रश्नपत्रिकेतील सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.*

*(२) प्रश्नांच्या उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

*(३) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहिताना संपूर्ण विधानासह लिहिणे आवश्यक आहे.*

*(४) सर्व प्रश्नांची उत्तरे नवीन पानावर लिहावीत.*

प्र. १. (अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा आणि संपूर्ण वाक्य लिहा [१४]

(कोणतेही सात) : (७)

(१) तुमच्या अभ्यासक्रमाप्रमाणे प्रसिद्ध सतारवादक -------- हे आहेत.

(पंडित रविशंकर, उस्ताद अली अकबर खाँ)

(२) बंदिशीमधील बोलांच्या आधारे म्हटली जाणारी तान म्हणजे -------- .

(बोलतान, बोल आलाप)

(३) पंडिता मृणालिनी साराभाई यांना नृत्य जगतात -------- म्हणून ओळखले जात असे.

(स्वरसम्राज्ञी, अम्मा)

(४) राग निर्मितीची क्षमता असलेल्या सप्तस्वरांच्या समूहाला -------- असे म्हणतात.

(थाट, राग)

0890 P.T.O.



Previous Pathshala

(५) 'रघुपति राघव राजाराम' या रामधुनची संगीत रचना ------ यांनी केली.

(पंडित भातखंडे, पंडित पलुस्कर)

(६) एक स्वर घेतांना पुढच्या किंवा मागच्या स्वराला स्पर्श करण्याच्या क्रियेला ------- म्हणतात.

(कण स्वर, न्यास स्वर)

(७) चौताल या तालाच्या मात्रा ------- आहेत.

(१२, १४)

(८) तुमच्या अभ्यासक्रमाप्रमाणे गायक व नट ------ हे आहेत.

(बालगंधर्व, उस्ताद फैय्याज खाँ)

(ब) खालील 'अ' गटातील शब्द/शब्दसमूहांच्या 'ब' गटातील शब्दांसोबत योग्य जोड्या जुळवा (कोणतेही सात) : (७)

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) बालगंधर्व | (१) आलाप-व्याख्या |
| (ब) विलंबित लयीत केलेला स्वरविस्तार | (२) गोदान |
| (क) पंडित रविशंकर | (३) ६ स्वर |
| (ड) षाडव | (४) शकुंतला |
| (इ) धृपद | (५) अलंकार |
| (फ) क्रमिक स्वररचना | (६) पकड |
| (ग) पंडित पलुस्कर | (७) चौताल |
| (ह) रागवाचक स्वरसमूह | (८) ग्वाल्हेर घराणे |

प्र. २. (अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही सात) : (७) [१४]

(१) बालगंधर्वांच्या कोणत्याही दोन स्त्री भूमिका लिहा.

(२) 'तोडा' म्हणजे काय?

(३) 'माय म्युझिक माय लाईफ' हे आत्मचरित्र कोणी लिहिले?



Previous Pathshala

(४) 'रजाखानी गत' या पारिभाषिक शब्दाची व्याख्या लिहा.

(५) तीन, तीन मात्रांचे विभाग असलेला अभ्यासक्रमातील ताल कोणता?

(६) 'जय जगदिश हरे' या रचनेला संगीत कोणी दिले?

(७) जवळ जवळच्या दोन-तीन स्वरांचा शीघ्रतेने आलटून पालटून प्रयोग करणे यास काय म्हणतात?

(८) 'द वॉईस ऑफ द हार्ट' हे आत्मचरित्र कोणी लिहिले?

**(ब)** खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा (कोणतेही सात) : (७)

(१) 'सिंधू' ही बालगंधर्वांची अखेरची भूमिका ठरली.

(२) आलापात घेतलेली मध्यलयीतील छोटी तान म्हणजे बेहलावा होय.

(३) पंडित पलुस्कर हे सरोदवादक होते.

(४) गायन वादनात स्वरांची कोमल आणि तीव्र रूपे सांभाळून क्रमवार स्वरसप्तक बनवणे म्हणजे मूर्च्छना होय.

(५) पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हे पंडित पलुस्कर यांचे गुरू होते.

(६) सात स्वर म्हणजे संपूर्ण जाती होय.

(७) एकताल हा ताल शास्त्रीय व सुगम संगीतासाठी उपयुक्त आहे.

(८) तंतूवाद्यावर मिजराबच्या एका आघातामध्ये एकाच वेळी दोन स्वर वाजवणे याला सुत म्हणतात.

**प्र. ३.** स्वातंत्र्यपूर्व किंवा स्वातंत्र्योत्तर काळातील संगीताची स्थिती सविस्तर लिहा. [१४]

https://www.maharashtrastudy.com

**प्र. ४.** स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील नाट्यसंगीताची विस्तृत माहिती लिहा. [१४]

[१४]

**प्र. ५.** **टिपा लिहा :**

(अ) भांगडा किंवा भरतनाट्यम् (७)

(ब) सतार किंवा ढोलकी (७)

P.T.O.



Previous Pathshala

SEAT NUMBER

**प्र. ६. निबंध लिहा :**

संगीत आणि विज्ञान

**प्र. ७. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

(अ) खालील ताल लिपीबद्ध करा (कोणतेही दोन) : (८)

(१) दीपचंदी

(२) एकताल

(३) धुमाळी

(ब) खालील गीतप्रकाराविषयी माहिती लिहा (कोणताही एक) : (८)

(१) ख्याल

पोवाडा

◆◆◆

Previous Pathshala